सकाळ : दि. 25.8.18

कोल्हापूर : आझाद हिंद राष्ट्रीय चॅरिटेबल ट्रस्टतर्फे डॉ. अभिनव देशमुख व शुभांगी गावडे यांच्या हस्ते राख्या थेट सीमेवर पाठविण्यासाठी ईश्वर पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या.

जवानांना राख्या हा स्तुत्य उपक्रम

डॉ. देशमुख; आझाद हिंद ट्रस्टतर्फे राख्या

कसबा बावडा, ता. २४ : आझाद हिंद ट्रस्टचा 'राष्ट्र रक्षाबंधन' हा उपक्रम स्तुत्यच आहे, असे गौरवोद्गार जिल्हा पोलिसप्रमुख डॉ. अभिनव देशमुख यांनी काढले. आझाद हिंद राष्ट्रीय चॅरिटेबल ट्रस्टतर्फे 'घरातील एक राखी सीमेवरील जवानांसाठी' या रक्षाबंधन उपक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी एक लाखाहून अधिक राख्या सीमेवर पाठविण्यासाठी टपाल कार्यालयाचे प्रवर अधीक्षक ईश्वर पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, मोहन मुल्हेरकर, प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास ट्रस्टचे अक्षय खोत, राहुल माळी, विनायक बोनगे, वैशाली पाटील, सुनील गनबावले, अजित पाटील, सुनील मुळे, मंदार पाटील, प्रा. अतुल निगुरे आदी उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष राहुल मगदूम यांनी प्रास्ताविक केले.